महाराष्ट्र शासन

उच्च शिक्षण संचालनालय

# शिक्षण शुल्क समिती, मुंबई

(राज्यातील विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांसाठी)

कार्यालयाचा पत्ता- शासकीय अध्यापक महाविद्यालय, एलफिन्स्टन तांत्रीक विद्यालय आवार,
१ ला मजला, ३ महापालिका मार्ग, धोबी तलाब, मुंबई-४०० ००१
Web:www.sssmumbai.org Tel-022 22694478 E-mail : sssbedmed@gmail.com/jd.hesss-mh@gov.in

**विषय:- दि.०५.०७.२०१७ रोजी सकाळी ११:०० वाजता मा. अध्यक्ष, शिक्षण शुल्क समिती तथा अप्पर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती, मुंबई, शासकीय अध्यापक महाविद्यालय, एल्फिस्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग, धोबी तलाब, मुंबई - येथे शासकीय अध्यापक महाविद्यालयातील प्राचार्यांच्या दालनामध्ये पार पडलेल्या शिक्षण शुल्क समितीच्या बैठकीचे इतिवृत्त ..**

**सदर बैठकीस खालील अधिकारी/पदाधिकारी उपस्थित होते.**

| अ.क्र. | उपस्थित अधिकारी/ पदाधिकारी | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्रीमती स्वाती नानल, उपसचिव मा . प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| २ | डॉ. एम. बी. भिडे, प्राचार्य, सिडनहॅम वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय, मुंबई | सदस्य |
| ३ | डॉ. रविंद्र कडू, खाजगी शिक्षक प्रशिक्षक संघटनेचे प्रतिनिधी (शारिरीक शिक्षणशास्त्र) | सदस्य |
| ४ | डॉ. सुशीलकुमार चोधरी, सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती, मुंबई | सदस्य |
| ५ | मा. डॉ. धनराज माने- संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य सचिव |
| ६ | मा. रोहिणी भालेकर, उप सचिव, उच्च शिक्षण, मंत्रालय, मुंबई | विशेष निमंत्रित |
| ७ | डॉ. तुकाराम गाढवे, तज्ज्ञ (निमंत्रित) | सदस्य |
| ८ | श्री. धनाजी वासके, खर्च लेखापाल | निमंत्रित |
| ९ | प्रा. श्री. एस. ए. सोनवणे, शिक्षणशास्त्र तज्ज्ञ | निमंत्रित |
| १० | प्रा. डॉ. रामेश्वर पवे, शिक्षणशास्त्र तज्ज्ञ | निमंत्रित |

**या बैठकीत घेण्यात आलेले महत्त्वाचे मुदेनिहाय निर्णय खालीलप्रमाणे......**

१. **मुद्दा क्र. १ राज्यातील शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांच्या शै. वर्ष २०१६-१७ च्या तज्ज्ञांकडून तपासणी झालेल्या शुल्कास मान्यता मिळणेबाबत.**

शिक्षण शुल्क समितीने नियुक्त केलेले तज्ज्ञ तसेच उपसमिती यांनी छाननीअंती निश्चित केलेले बी. एड., एम. एड., बी. पी. एड. व एम. पी. एड. या अभ्यासक्रमाचे (महाविद्यालयांचे) एकूण १९३ प्रस्ताव

समितीसमोर मान्यतेसाठी ठेवण्यात आले होते. तज्ज्ञांनी तपासलेले प्रस्ताव स्प्रेड शिट स्वरूपात समिती सदस्यांसमोर मान्यतेसाठी ठेवण्यात आले होते. समितीने सदर प्रस्तावापैकी १० टक्के मर्यादेत शिक्षण शुल्कात वाढ देण्याची शिफारस केलेले प्रस्ताव, १० टक्के पेक्षा जास्त नमुद केलेले प्रस्ताव व ऋण वाढ नमुद केलेले प्रस्ताव अशी वर्गवारी करून सदर प्रस्तावांची नमुनात्मक तपासणी करण्यात आली. तसेच दि.२६.०४.२०१७ च्या बैठकीत ठेवलेले शिक्षणशास्त्र तज्ज्ञांनी तपासलेले ६३ प्रस्ताव पुढील वर्षी बोलावण्यात यावेत, असे मत शिक्षणशास्त्र तज्ज्ञांनी मांडले होते. परंतू हे मत महाविद्यालयांच्या वित्तीय बाबींशी संबंधीत नसून ते एन.सी.टी.ई. व विद्यापीठातील एलआयसी समितीशी संबंधीत आहे. त्यामुळे या ६३ महाविद्यालयांचे सन २०१६-१७ चे शुल्क निश्चित करून दयावे व प्रस्तावात असणा-या बाबी शासनास कळवाव्या असा व शुल्क निश्चितीच्या बाबतीत समितीने एकमताने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

१. **परिशिष्ट अ** मध्ये नमुद ९४ बी. एड. अभ्यासक्रमांच्या/महाविद्यालयांच्या उपसमितीने निश्चित/ अंतीम केलेल्या शुल्काला शिक्षण शुल्क समितीची मंजूरी देण्यात आलेली आहे.
२. **परिशिष्ट ब** उर्वरित बी. एड. अभ्यासक्रमांच्या / महाविद्यालयांच्या १६ प्रस्तावापैकी १५ प्रस्तावातील शुल्कामध्ये ऋणात्मक वाढ असल्यामुळे संबंधीत महाविद्यालयांना नोटीस देऊन कळवावे. योग्य ती माहिती मागवून प्रस्तावांची पुनर्छाननी करून ती पुढील बैठकीत ठेवण्यात यावी तसेच के. जे. सोमैय्या शिक्षणशास्त्र महाविद्यालय, विद्याविहार या महाविद्यालयाच्या प्राचार्यांना बोलावून चर्चा करावी व प्रस्तावातील त्रुटी पूर्तता झाल्यावर पुढील बैठकीत निर्णय घेण्यात येईल असे ठरले.
३. **परिशिष्ट क** बी. एड अभ्यासक्रम (अल्पसंख्यांक) महाविद्यालयाच्या २२ प्रस्तावापैकी २० महाविद्यालयांच्या शुल्कास अंतिम मान्यता देण्यात आली.
४. **परिशिष्ट ड** उर्वरित बी. एड अभ्यासक्रम (अल्पसंख्यांक) महाविद्यालयाच्या ०२ पैकी एका प्रस्तावात ऋणात्मक वाढ असल्यामुळे दुसऱ्या प्रस्तावात २०१५-१६ च्या शुल्काबाबत तफावत असल्यामुळे संबंधीत महाविद्यालयांना नोटीस देऊन कळवावे. योग्य ती माहिती मागवून प्रस्तावांची पुनर्छाननी करून ती पुढील बैठकीत ठेवण्यात यावी, असे ठरले.
५. **परिशिष्ट इ** एम. एड महाविद्यालयांच्या २७ प्रस्तावांपैकी ११ महाविद्यालयांच्या शुल्कास अंतिम मान्यता देण्यात आली आहे.
६. **परिशिष्ट फ** उर्वरित एम. एड महाविद्यालयांच्या १६ पैकी १४ प्रस्तावांत ऋणात्मक वाढ असल्यामुळे संबंधीत महाविद्यालयांना नोटीस देऊन कळवावे. योग्य ती माहिती मागवून प्रस्तावांची पुनर्छाननी करून ती पुढील बैठकीत ठेवण्यात यावी, असे ठरले. तसेच विद्यापीठाच्या विभागाकडून ०२ प्रस्ताव या

कार्यालयास प्राप्त झालेले आहेत. त्या विद्यापीठाच्या विभागातील शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमाचे शुल्क नवीन विद्यापीठ कायद्यानुसार शिक्षण शुल्क समितीने ठरवावे किंवा विद्यापीठाने ठरवावे याबाबत कायदेशीर सल्ला मागविण्यात यावा.

७. **परिशिष्ट ग** एम. एड अभ्यासक्रम (अल्पसंख्यांक) महाविद्यालयाच्या ११ प्रस्तावापैकी ०७ महाविद्यालयांच्या शुल्कास अंतिम मान्यता देण्यात आली.

८. **परिशिष्ट ह** उर्वरित एम. एड अभ्यासक्रम (अल्पसंख्यांक) महाविद्यालयाच्या ४ पैकी ३ प्रस्तावांत ऋणात्मक वाढ असल्यामुळे संबंधीत महाविद्यालयांना नोटीस देऊन कळवावे. योग्य ती माहिती मागवून प्रस्तावांची पुनर्छाननी करून ती पुढील बैठकीत ठेवण्यात यावी तसेच के. जे. सोमैय्या शिक्षणशास्त्र महाविद्यालय, विद्याविहार यांच्या प्रस्तावात त्रुटी बाबतीत तफावत असल्यामुळे या महाविद्यालयाच्या प्राचार्यांना बोलावून चर्चा करावी व प्रस्तावातील त्रुटी पूर्तता झाल्यावर पुढील बैठकीत निर्णय घेण्यात येईल असे ठरले.

९. **परिशिष्ट ई** बी. पी. एड अभ्यासक्रम महाविद्यालयाच्या एकूण ०९ पैकी ०६ महाविद्यालयांच्या शुल्कास अंतिम मान्यता देण्यात आली.

१०. **परिशिष्ट ज** उर्वरित ०३ प्रस्तावांत ऋणात्मक वाढ असल्यामुळे संबंधीत महाविद्यालयांना नोटीस देऊन कळवावे. योग्य ती माहिती मागवून प्रस्तावांची पुनर्छाननी करून ती पुढील बैठकीत ठेवण्यात यावीत.

११. **परिशिष्ट ल** एम. पी. एड अभ्यासक्रम महाविद्यालयाच्या एकूण १२ पैकी ०९ महाविद्यालयांच्या शुल्कास अंतिम मान्यता देण्यात आली.

१२. **परिशिष्ट म** उर्वरित ३ पैकी २ प्रस्तावांत ऋणात्मक वाढ असल्यामुळे संबंधीत महाविद्यालयांना नोटीस देऊन कळवावे. योग्य ती माहिती मागवून प्रस्तावांची पुनर्छाननी करून ती पुढील बैठकीत ठेवण्यात यावी. तसेच विद्यापीठाच्या विभागाकडून ०१ प्रस्ताव या कार्यालयास प्राप्त झालेला आहे. त्या विद्यापीठाच्या विभागातील एम.पी.एड अभ्यासक्रमाचे शुल्क नवीन विद्यापीठ कायद्यानुसार शिक्षण शुल्क समितीने ठरवावे किंवा विद्यापीठाने ठरवावे याबाबत कायदेशीर सल्ला मागविण्यात यावा.

१३. **परिशिष्ट न** बी. एड इंटीग्रेटेड अभ्यासक्रम चालविणा-या ०१ महाविद्यालयाच्या शुल्कास अंतिम मान्यता देण्यात आली.

शुल्क निश्चिती झालेल्या उपरोक्त महाविद्यालयांची यादी परिशिष्ट निहाय सोबत जोडलेली आहे.

२. **ज्या महाविद्यालयांना दि.२६.०४.२०१७ च्या बैठकीच्या अनुषंगाने निश्चित करण्यात आलेले शुल्क मान्य नाही किंवा त्या शुल्काबाबत ज्या महाविद्यालयांच्या तक्रारी प्राप्त झाल्या अशा महाविद्यालयांच्या बाबतीत निर्णय होणेबाबत:-**

रिझवी कॉलेज ऑफ एज्युकेशन, बांद्रा, मातोश्री सायरबाई चंपालालजी चोपडा बी.एड कॉलेज, खामगांव या महाविद्यालयांची मान्य झालेल्या शुल्कासंदर्भात हरकत प्राप्त झालेली आहे, यासंदर्भात झालेली तक्रार चूकीची आहे किंवा बरोबर याची समिती नेमून या महाविद्यालयांच्या प्राचार्यांना बोलावून चर्चा करावी, याबाबत झालेला निर्णय समितीच्या पुढील बैठकीत ठेवून त्यात शुल्काबाबत निर्णय घेतला जाईल.

३. **दि.२६.०४.२०१७ च्या बैठकीतील निर्णयानुसार ज्या महाविद्यालयांनी दि.३१.०५.२०१७ पर्यंत शुल्क निश्चितीसाठी प्रस्ताव/प्रस्तावातील मागविलेल्या त्रुटी सादर केल्या नाहीत, अशा महाविद्यालयांची नावे प्रवेश नियामक प्राधिकरण, बांद्रा यांना कळविण्यात आलेली आहेत, त्या निर्णयाचा पूनर्विचार होणेबाबत:-**

दि.३१.०५.२०१७ पर्यंत शुल्क निश्चितीसाठी प्रस्ताव सादर न केलेल्या /मागविण्यात आलेल्या त्रुटी सादर न केलेल्या महाविद्यालयांच्या बाबतीत दि.२६.०४.२०१७ रोजी शिक्षण शुल्क समितीच्या बैठकीत प्रवेश नियामक प्राधिकरणास महाविद्यालयाचे नाव कळवून सन २०१७-१८ पासून प्रवेश थांबविणे बाबत घेण्यात आलेला निर्णय महाविद्यालयांच्या हितास्तव मागे घेण्यात येऊन ज्या महाविद्यालयांनी दि.३१.०५.२०१७ पर्यंत शुल्क निश्चितीसाठी प्रस्ताव सादर केलेले नाहीत अशा महाविद्यालयांच्या अंतिम मंजूर शुल्कामध्ये २५ टक्के कपात करावी तसेच सूचना देऊन ज्या महाविद्यालयांनी दि.३१.०५.२०१७ पर्यंत त्रुटींची पूर्तता केलेली नाही, अशा महाविद्यालयांनी यापूर्वी निश्चित करून दिलेले शुल्क आकारावे (**परिशिष्ट प**), असा निर्णय झाला.

४. **राज्यातील शासकीय अध्यापक महाविद्यालयात चालविण्यात येणाऱ्या एम. एड. अभ्यासक्रमासाठी नोंदणी शुल्क, विलंब शुल्क व दंडात्मक शुल्क माफ करणेबाबत:-**

राज्यातील ज्या शासकीय अध्यापक महाविद्यालयात विनाअनुदानीत तत्त्वावर एम. एड. हा अभ्यासक्रम चालविण्यात येतो. मात्र विद्यार्थी संख्या कमी झाल्याने या अभ्यासक्रमाबाबत शिक्षण संचालकांनी प्राचार्यांशी चर्चा करून अभ्यासक्रम पुढे चालू ठेवावा किंवा कसे याबाबतचा सविस्तर अहवाल शासनास सादर करावा. अशा महाविद्यालयात मागील वर्षी एकही विद्यार्थी नसल्यामुळे सदर महाविद्यालयाकडून नोंदणी शुल्क, विलंब शुल्क व दंडात्मक शुल्क माफ करणेबाबत विनंती करण्यात आली होती. परंतू सद्यस्थितीत शिक्षण शुल्क समितीकडून आकारले जाणारे नोंदणी शुल्क, विलंब शुल्क व दंडात्मक रक्कम शासकीय अध्यापक महाविद्यालयातील एम. एड अभ्यासक्रमासाठी लागू राहील, असा निर्णय झाला.

**५. शुल्क निश्चितीसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांची उपसमितीने सूचविल्याप्रमाणे सनदी लेखापाल किंवा खर्च लेखापाल यापैकी एकाकडूनच तपासणी करणे याबाबतचा निर्णय दि.२६.०४.२०१७ च्या बैठकीत झालेला आहे, परंतु इतिवृत्तात नमुद झाले नाही तरी या बैठकीच्या इतिवृत्तात समाविष्ठ करण्यास अनुमती मिळणेबाबत:-**

शिक्षण शुल्क निश्चितीसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांची तपासणी सनदी लेखापाल व खर्च लेखापाल यांच्यामार्फत करण्यात येते, परंतू दि.२६.०४.२०१७ च्या बैठकीत उपसमितीने सूचविल्याप्रमाणे सनदी लेखापाल किंवा खर्च लेखापाल यापैकी एकाकडूनच प्रस्तावांची तपासणी करावी, असा निर्णय घेण्यात आला.

**६. श्री. हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, अमरावती यांचे डिग्री कॉलेज ऑफ फिजीकल एज्युकेशन या महाविद्यालयासाठी मान्य झालेल्या शुल्कासंदर्भात प्राप्त झालेल्या हरकतीबाबत:-**

श्री. हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, अमरावती यांचे डिग्री कॉलेज ऑफ फिजीकल एज्युकेशन या महाविद्यालयातील विनाअनुदानित तत्त्वावरील अभ्यासक्रमासाठी ही संस्था स्वायत्त असल्यामुळे विद्यापीठाच्या विधी नियमान्वये त्यांना स्वत:ला शुल्क निश्चितीचे अधिकार आहेत, असा दावा त्यांनी केला आहे. मात्र नवीन विद्यापीठ कायद्यानुसार या महाविद्यालयास शुल्क निश्चितीचे अधिकार आहेत की नाही, तसेच एन. सी. टी. ई. रेग्युलेशनप्रमाणे शिक्षण शुल्क समिती अस्तित्वात असताना महाविद्यालयास अधिकार राहील काय, याबाबत कायदेशीर बाबी तपासाव्यात तोपर्यंत त्यांनी निश्चित केलेले शुल्क अंतरिम म्हणून घेण्याची त्यांना मूभा राहील.

**७. जी अल्पसंख्यांक महाविद्यालये दि.२६.०४.२०१७ च्या बैठकीत रेग्युलर बी. एड. महाविद्यालयांच्या यादीमध्ये दर्शविली होती. ती महाविद्यालये अल्पसंख्यांक महाविद्यालयांच्या यादीमध्ये समाविष्ट करणेबाबत:-**

ही दुरूस्तीची कार्यवाही सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती, मुंबई या कार्यालय स्तरावर करण्यात यावी, असा निर्णय झाला.

**८. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी उपस्थित होणारे विषय:-**

१. समितीतील नामनिर्देशित सदस्यांची मुदत संपणार असल्याने समितीचे सदस्य तथा शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी शासनास नावे कळविण्यात यावी, असे ठरले.

२. शिक्षण शुल्क समिती, मुंबई या कार्यालयासाठी शासकीय तंत्रनिकेतन मधील जागा मिळणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात यावा.

३. शिक्षण शुल्क समितीला प्रशासकीय अधिकारी उपलब्ध करून देणेबाबत संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेस्तरावर प्रक्रीया व्हावी.

९. आभार प्रदर्शनानंतर मा. अध्यक्ष, शिक्षण शुल्क समिती, मुंबई तथा मा. अप्पर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्या परवानगीने बैठक समाप्त झाली.

सदस्य सचिव,
शिक्षण शुल्क समिती तथा
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, पुणे

अध्यक्ष,
शिक्षण शुल्क समिती तथा अप्पर मुख्य सचिव, उच्च
व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई